राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)


---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :६८०/२०२३/जळगाव.**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. गणेश स्वरुपचंद जाधव,<br>रा. मु. पो. वसंतनगर, ता. पारोळा,<br>जि. जळगाव. | १)मुख्याध्यापक,<br>प्राथमिक आश्रम शाळा, वसंतनगर,<br>ता. पारोळा, जि. जळगाव.<br>२)मुख्याध्यापक,<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा,<br>वसंतनगर, ता. पारोळा, जि. जळगाव. |

**सुनावणी दिनांक १३/०३/२०२५**

तक्रारदार यांनी दिनांक २३/१०/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत तक्रारीची यापूर्वी दि. १३/०२/२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असता तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळावी अशी विनंती आयोगाकडे समक्ष केली.त्यानुसार सदर तक्रारीची दि. १३/०३/२०२५ रोजी सुनावणी त्यामध्ये दिनांक १३/०३/२०२५ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार आणि संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक. २३/१०/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात असेनमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार अद्याप ही माहिती दिलेली नाही.

३) तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक. २५०२/२०१८/जळगाव संदर्भात दिनांक २२/०३/२०२२ अन्वये आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा, भोलाणे तांडा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०४/०३/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

४) सुनावणीपुर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. २७/१०/२०२३ अन्वये मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. तसेच सुनावणीसाठी संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित असले तरी देखील त्यांनी कोणताही अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे या तक्रारीची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २५०२/२०१८/जळगाव मध्ये दिनांक २२/०३/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, वसंतनगर, ता. पारोळा, जि. जळगांव यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसांत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी

खुलासा विहित मुदतीत आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २५०२/२०१८/जळगाव मध्ये दिनांक २२/०३/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, वसंतनगर, ता. पारोळा, जि. जळगांव यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसांत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक ६८०/२०२३/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नासर्डी पुलाजवळ, द्वारका, नाशिक, ता. जि. नाशिक.

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र २८८२ 08 APR 2025